
दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 21 एप्रिल 2026 | अंक क्र. 331 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com





# परळी शहरात खासगी ट्रॅव्हल्सच्या मनमानीला पोलीस प्रशासनाचा चाप

## प्रशासनाचे 'सकारात्मक पाऊल'; बैठकीत दिल्या कडक सूचना;

## बसस्थानकासमोरील वाहतूक कोंडी सुटणार !

■ परळी वैजनाथ

शहरातील मुख्य बसस्थानकासमोर खासगी ट्रॅव्हल्सच्या अवैध थांब्यामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता, परळी शहर पोलीस स्टेशनच्या वतीने आता कठोर भूमिका घेतली आहे. पोलीस निरीक्षक परळी रघुनाथ नाचण यांनी ट्रॅव्हल्स चालक आणि मालकांची तातडीने बैठक घेऊन त्यांना 'दणका' दिला असून, हा थांबा शहराबाहेर हलवण्याच्या सक्त सूचना केल्या आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रीय महामार्ग ५४८बी वरील बसस्थानक परिसरात खासगी ट्रॅव्हल्समुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. या गंभीर समस्येची दखल घेत परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण यांनी हद्दीतील सर्व ट्रॅव्हल्स चालक, मालक आणि एजंट यांची बैठक बोलावली. या बैठकीत प्रशासनाने स्पष्ट केले की,वाहतुकीला अडथळा ठरणारा सध्याचा थांबा यामुळे कुठल्याच प्रकारचा त्रास नाही झाली पाहिजे आणि नियमानुसार कडक कारवाईत करण्यात येतील असेही सांगितले.



### कारवाईचा बडगा

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर 'मोटार वाहन कायद्या'नुसार (MV Act) गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

वाहतूक सुरळीत करण्याला प्राधान्य: प्रवाशांची सुरक्षितता आणि रस्त्यावरील शिस्त कायम राखण्यासाठी कोणत्याही प्रकारची हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही, असे पोलीस प्रशासनाच्या वतीने बजावले आहे.

– रघुनाथ नाचण,
पोलीस निरीक्षक,परळी शहर

### काय होती समस्या ?

मंठा ते संकेश्वर कर्नाटक या राष्ट्रीय महामार्गावर परळी हे महत्त्वाचे केंद्र असल्याने येथे मोठी वर्दळ असते. मात्र, सायंकाळी ५ ते रात्री १२ या वेळेत खासगी ट्रॅव्हल्स रस्त्यावरच उभ्या राहत असल्याने सर्वसामान्यांना रस्ता ओलांडणेही कठीण झाले होते. अरुंद रस्ता आणि ट्रॅव्हल्स चालकांची दादागिरी यामुळे नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये मोठा संताप होता.

### नागरिकांकडून निर्णयाचे स्वागत

पोलीस प्रशासनाने घेतलेल्या या धाडसी निर्णयामुळे परळीकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. बसस्थानक परिसर मोकळा झाल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल शहरवासीयांनी समाधान व्यक्त केले असून, या निर्णयाची कायमस्वरूपी अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





डिजिटल मीडियाचे तालुका सचिव तसेच PLN MEDIA चे संपादक मुदस्सिर शेख यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी फुले- आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे, लक्ष्मण वैराळ सर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा कोषाध्यक्ष तसेच पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आरबूने, गिरीश जाधव सर, नितीन ढाकणे, माहिती अधिकार संघाचे शहर प्रमुख सम्राट गित्ते, दिसत आहेत.

# संपादकीय

## गॅस टंचाई, पॅरासीटामॉल, खत समस्या ते हेलियम - सामान्य माणसाच्या घरात पोहोचू लागलेले इराण युद्धाचे परिणाम!

इराणवर अमेरिकन, इस्रायली हल्ले सुरू होऊन आता महिना होत आला. पहिल्या ७२ तासात इराणी शिया राजवट सत्तेवरून खाली येईल आणि आपली गुलाम राजवट इराणवर येऊन आपण हा विषय मार्गी लावून मग क्युबाचा घास घ्यायला मोकळे होऊ ही ट्रम्पची योजना काही पूर्ण होताना दिसत नाही.

इराणी सैन्याने पहिल्या काही दिवसात होर्मुझ स्ट्रेट बंद केल्याने जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. आता इराण सध्या काही देशांची जहाजे आणि तेल टँकर्स प्रत्येकी २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे १८ कोटी रुपये घेऊन काही देशांची जहाजे होर्मुझ स्ट्रेट मधून जाऊ देत आहे त्यात भारतीय जहाजे सुद्धा आहेत. होर्मुझच्या आत आणि बाहेर सुमारे साडे तीन हजार जहाजे, टँकर्स अडकून पडले आहेत. आजपर्यंत इराणी सैन्याला न जुमानता बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० जहाजांवर इराणी सैन्याने मिसाईल किंवा ड्रोन डागून ती जाळल्याने कुणीही या धाडसात उतरायला तयार नाही.

जागतिक तेल पुरवठ्याच्या विस्कळीत होण्याने फक्त पेट्रोल डिझेलची टंचाई निर्माण होईल अशी सगळ्यांची धारणा असते. परंतु आधुनिक जगात क्रूड तेलापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांनी आणि वस्तूंनी इतक्या प्रमाणात घुसखोरी केलेली आहे की क्रूड पुरवठा बंद म्हणजे सामान्य माणसाचं आयुष्य ठप्प अशी स्थिती आहे. काल भारतीय संसदेत पंतप्रधान मोदी यांनी याची लॉकडाऊन सोबत केलेली तुलना ही ह्या टोकाच्या क्रूड अवलंबनामुळेच आहे.

याचे दूरगामी परिणाम लक्षात ठेवले आणि आपल्याला नेमक्या काय अडचणी येऊ शकतात हे बघितलं तर येणारे काही महिने आपण काळजी घेऊ शकतो. १. गॅस तुटवडा : कतरच्या रास लफ्फान गॅस टर्मिनल वर झालेल्या इराणी हल्ल्यात मोठ्या नुकसानामुळे भारताच्या ४७% गॅस पुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे. यामुळे गॅसवर आधारित सगळे उद्योग अडचणीत आहेत. कोळशाला पर्याय म्हणून, प्रदूषण विरहित आणि वापरायला सोपा म्हणून एलपीजी गॅस कित्येक उद्योगात एकमेव इंधन स्रोत म्हणून वापरला जातो. याच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याने होणारी अडचण आता समोर येऊ लागली आहे. ** रेस्टॉरंट आणि तयार अन्न उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. याचा थेट परिणाम येणाऱ्या काळात फूड होम डिलिव्हरी उद्योगावर होईल. यात लक्षावधी लोक डिलिव्हरी चेनमध्ये राहून रोजगार कमावतात ते याने बेरोजगार होतील.

जगातील क्रमांक २ चे सिरॅमिक उत्पादन हब गुजरातच्या मोर्बी मध्ये विकसित झालेलं आहे. इथे देशातील ९०% टाईल्स उत्पादन होतं आणि यात ९ लाखाच्या आसपास माणसे काम करतात.इथे वार्षिक ५०,००० कोटींची उलाढाल होते पैकी १८,००० कोटींची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून इथल्या ५०० कारखान्यांनी काम बंद केलं आहे कारण सध्या फक्त घरगुती गॅस पुरवठा ही सरकारची प्राथमिकता आहे. याचा परिणाम काही काळानंतर रिअल इस्टेट मधील रोजगारावर होईल कारण घर, फ्लॅट बांधून झाला तरी अंतर्गत कामे टाईल्स नसल्याने खोळंबतील.

काचेच्या बाटल्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या भट्ट्या मोठ्या प्रमाणात गॅस वापरतात. या भट्ट्या बंद करून परत चालू करण्यात मोठा वेळ जातो आणि परत सुरू करताना नुकसान होऊ शकतं. बाटल्यांचा पुरवठा खंडित किंवा विस्कळीत झाला की दारू, औषधे पॅकिंग साठी वापरल्या जाणाऱ्या बाटल्या महाग होणार किंवा अपुऱ्या पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण होणार. याला पर्याय म्हणून प्लास्टिक बाटल्यांचा पर्याय बघावा तर तो ही पेट्रोलियम पदार्थांपासून बनतो त्यामुळे त्यातही अडचण आहेच.

पेट्रोकेमिकलवर आधारित औषध उद्योग : कित्येक आधुनिक औषधे पेट्रोकमिकल पासून बनतात. त्यामुळे त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम औषध उत्पादनावर होणं स्वाभाविक आहे. अनेक औषधात जवळपास सगळे इंग्रेडिएंट पेट्रोकेमिकल मधून येतात.

आपण रोजच्या आयुष्यात सगळ्यात जास्त वापरतो ते औषध म्हणजे पॅरासिटामॉल ते फिनॉलपासून तयार होतं. आयबुप्रोफेन हे वेदनाशामक आयसोब्युटिल्बेन्झिन आणि प्रोपियोनिक ॲसिडपासून तयार होतं. डायबेटिक पेशंट रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरतात ते मेटफॉर्मिन ८० ते ९०% पेट्रोकेमिकल आधारित असतं. याशिवाय अन्य औषधांसाठी लागणारा ९९ टक्के कच्चा माल पेट्रोकेमिकलपासून येतो. प्लास्टिक बनवणारे 'क्रॅकर्स' बंद झाले की औषधांचा कच्चा मालही उपलब्ध व्हायचा बंद होतो.

होर्मुझ स्ट्रेट मधून औषध निर्मितीसाठी लागणारा 'नॅफ्था' जगभरात पोचतो, ती सध्या बंद आहे. नॅफ्था हा औषध उद्योगात सॉल्व्हेंट म्हणून वापरतात आणि ॲक्टिव्ह इंग्रेडियंट वेगळा करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जगाच्या २० टक्के आणि अमेरिकेच्या ४० टक्के गरजा भारत पूर्ण करतो. पण सध्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे हा उद्योग संकटात आहे. कमी पुरवठ्यामुळे सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने उद्योगांना मिळणाऱ्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची टंचाई निर्माण झाली आहे.

भारतातील 'सीरम इन्स्टिट्यूट' सारख्या संस्था जगाला ४०-५०% लसी पुरवते, त्याही याच पेट्रोकेमिकल पदार्थांवर अवलंबून आहेत. लसीच्या बाटल्या, सिरिंज, पॅकेजिंग मधील अत्यंत उच्च दर्जाचं विशेष ग्रेडचं प्लास्टिक आणि लसीमधील घटकही पेट्रोकेमिकलवर आधारित आहेत. त्यामुळे याच्या उत्पादन खर्चात वाढ आणि उपलब्धतेत घट होऊ घातली आहे.

३. खते आणि कृषी उत्पादन : जागतिक रासायनिक खतांच्या उत्पादनात अरब देश आणि इराणचा वाटा २०% आहे पण युरिया उत्पादनात हा वाटा ४६% आहे. भारत, ब्राझील, चीन हे अरब देशांचे मोठे ग्राहक आहेत. भारत आपल्या वार्षिक गरजेच्या ५०% युरिया अरब देशातून घेतो. शिवाय अमोनियम नायट्रेट सारखी अन्य खते अरब देशातून येतात. आज रशियाने खतांच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केल्याने भारतासाठी आगामी काळात वाढलेल्या दराने खते विकत घ्यावी लागतील. शिवाय कमी खतांमुळे देशातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे जगभरात अन्नाच्या टंचाईची शक्यता आत्ताच बोलून दाखवली जात आहे. अन्न टंचाई आणि राजकीय स्थिरता याचा जवळचा संबंध आहे. ज्या ज्या देशात अन्न टंचाई निर्माण होते आणि महागाई वाढते त्या त्या देशात सत्ताधारी पक्षांना आंदोलने आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो असा इतिहास आहे यामुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेत याने बरीच राजकीय वादळे येऊ घातली आहेत.

४. सल्फर टंचाई : अरब देशांचा सल्फर उत्पादनात ५०% जागतिक वाटा आहे. जवळपास सर्व रिफायनरी इराणी हल्ल्यांनी प्रभावित झालेल्या आहेत किंवा होर्मुझ स्ट्रेट बंद असल्याने तयार उत्पादन जागतिक बाजारात जायला रस्ता उपलब्ध नाही. याचा परिणाम सल्फर आधारित खतांच्या पुरवठ्यावर झाला आहे, शिवाय याचे दर ५०% नी वाढले आहेत.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांची घोषणा केलेल्या विभागाचा मंत्री झालो, हे माझे भाग्य : मा.मंत्री धनंजय मुंडे

## नाथरा गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य पुतळ्याचे थाटात अनावरण

**सिरसाळा (प्रतिनिधी, अतुल बडे):**

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या सामाजिक न्याय विभागाची घोषणा केली होती, त्याच विभागाचा मला मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली, हे मी माझे मोठे भाग्य समजतो," असे उद्गार माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी काढले. परळी तालुक्यातील नाथरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचा अनावरण व लोकार्पण सोहळा १९ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना मुंडे बोलत होते.

आपल्या भाषणात धनंजय मुंडे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले: "स्व. पंडित अण्णा यांनी देखील नाथरा गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारला होता. आज त्याच पाऊलवाटेवर चालताना, परळीतील पुतळ्याप्रमाणेच एक भव्य आणि देखणा पुतळा नाथरा गावात उभारला गेला आहे, याचा मला मनस्वी आनंद होत आहे."

या ऐतिहासिक सोहळ्यासाठी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी अजय मुंडे ,डॉ. संतोष मुंडे, राजेभाऊ पौळ,बाबुराव रुपनर, अनंत इंगळे, अभय मुंडे (सरपंच), मधुकर आघाव, सूर्यभान मुंडे, मोतीराम बापू चोपडे, ॲड. विलास बडे या कार्यक्रमाला नाथरा, परळी आणि सिरसाळा परिसरातील आंबेडकर अनुयायी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# बदलत्या हवामानामुळे देशासह विदर्भाने तापमानाच्या बाबतीत उच्चांक गाठला ;स्वत:ला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत उष्णतामान वाढल्याने देशासह विदर्भात आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.आजच्या परिस्थितीत विदर्भाने तापमानाच्या बाबतीत मोठा उच्चांक गाठल्याचे सर्वत्र उष्णतेचा कहर दिसून येतो.विदर्भातील अकोला शहराने देशात उच्चांकी कमाल तापमानाचा रेकॉर्ड केला असतांना दिनांक १९ तारखेला वर्धा जिल्ह्याने अकोल्याचा रेकॉर्ड मोडून ४५ अंश सेल्सिअस एवढी नोंद केली आहे.सध्या राज्यात विदर्भात वाढत्या उष्णतेमुळे आगडोंब उसळल्याचे चित्र आहे.ही अत्यंत भयावह परिस्थिती आहे. राज्यातील १५ जिल्ह्यात ४० हून अधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. राज्यातील उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून विशेषतः विदर्भ विभागात तापमानाने धोकादायक पातळी गाठली आहे.सध्या वर्धा येथे ४५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून हा आकडा सध्या जगातील सर्वाधिक तापमानाच्या नोंदीपैकी एक मानला जात आहे.यावरून आपण समजू शकतो की, देशातीलच



नाही,तर जगातील वाढते तापमान धोकादायक पातळी पोहोचले आहेत.याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाची हत्या, जंगलतोड,जगातील युद्धजन्य परिस्थिती, औद्योगिकरण, वाढते शहरीकरण, वाढते प्रदुषण आणि अत्याधुनिक सुख-सुविधा यामुळे देशासह जगातील तापमानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज जगात तापमानाच्या बाबतीत देशातील विदर्भाची नोंद झाली असून इथे आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आज विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४.२, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली --४३.२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत. यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे.देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे,तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे. विदर्भात हवामान खात्याने एलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे वाढते तापमान पहाता नागरिकांनी आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी.सुर्याचे अक्राळविक्राळ रूप पहाता नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावे.घरून निघतांना काणाला व तोंडाला दुपट्टा बांधून निघावे,कॉटनचे कपडे घालावेत,पाणी जास्तीत जास्त प्यावे, थंड पेय घ्यावे,महत्त्वाचे काम असेल तर घराच्या बाहेर निघावे, लहान मुले व वृद्धांना बाहेर निघण्यापासुन सावधगिरी बाळगावी. कारण सुर्याने विदर्भात उष्णतेचे तांडव सुरू केले यापासून स्वतःला सांभाळने आवश्यक आहे. कारण जगात सर्वाधिक उष्णतेच्या बाबतीत विदर्भाची नोंद झाली आहे.अकोला, वर्धा या दोन्ही शहरांचा पारा ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे आणि जगातील उष्ण शहरांच्या पहिल्या दहामध्ये नागपूर, अमरावती सह अन्य दहा शहराचा समावेश आहे.त्यामुळे देशासह विदर्भात जीवघेण्या उष्णतेमुळे सर्वत्र "अदृश्य संचारबंदी" असल्याचे वातावरण दिसून येते.कारण उन्हाच्या चटक्यामुळे सर्वत्र शांततेचे वातावरण दिसून येते.त्यासुळे उन्हापासून स्वतःला सांभाळा,सतर्क रहा, काळजी घ्या.जय हिंद.

**लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**




# परळीत 'स्वामीज सांबार'चा भव्य शुभारंभ; पहिल्याच दिवशी खवय्यांची गर्दी !

**परळी वैजनाथः नितीन ढाकणे**

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर शहरात सुरू झालेल्या 'स्वामीज सांबार' या साऊथ इंडियन उपहारगृहाचा उद्घाटन सोहळा राज्याचे मा.मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते नवीन दालनाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे, राजकीय क्षेत्रासोबतच सामाजिक, व्यापारी आणि शैक्षणिक अशा सर्व स्तरांतील मान्यवरांनी यावेळी उपस्थिती लावून या नवीन उपक्रमाला भरभरून शुभेच्छा दिल्या. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर परळीकरांच्या सेवेत दाखल झालेल्या 'स्वामीज सांबार' या साऊथ इंडियन उपहारगृहाचे उद्घाटन होताच परळीतील खवय्यांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली, पहिल्याच दिवशी या हॉटेलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः साऊथ इंडियन पदार्थांची अस्सल चव, स्वच्छता आणि उत्कृष्ट सेवा यामुळे हे हॉटेल अल्पावधीतच शहराचे केंद्रस्थान बनेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

### 'अस्सल चव अन् दर्जेदार क्वालिटी'

**उद्घाटनानंतर उपहारगृहात खवय्यांची मोठी रीघ पाहायला मिळाली. विशेषतः येथील सांबार आणि चटणीच्या अनोख्या चवीने नागरिकांना भुरळ घातली आहे. परळीत अशा प्रकारची अस्सल साऊथ इंडियन चव प्रथमच मिळत आहे, अशा शब्दांत ग्राहकांनी पदार्थांच्या क्वालिटीचे कौतुक केले. श्रीकांत तोतला आणि नरेश (माऊली) चिकणे यांनी यावेळी आलेल्या सर्व ग्राहकांचे आभार मानले असून, ही दर्जेदार सेवा अखंड सुरू राहील अशी ग्वाही दिली.**

## सांबार-चटणीच्या चवीवर नागरिक फिदा! चविष्ट पदार्थांनी जिंकली खवय्यांची मने!




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)


# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त परळीत भव्य जन्मोत्सव व शोभायात्रा उत्साहात

### माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांची भेट; वीरभद्र पुरवंत संघाच्या चित्तथरारक, जोशपूर्ण नृत्य , पारंपारिक कलाकृतीने परळीकर मंत्रमुग्ध

### न्यू माणिक नगर वीरशैव लिंगायत समाज बांधव व कल्याणकारी हनुमान मंदिराचा उपक्रम







**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त न्यू माणिकनगर येथील वीरशैव लिंगायत समाज बांधव व कल्याणकारी हनुमान मंदिराच्या वतीने दि. १५ ते १९ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाची सांगता भव्य व पारंपरिक शोभायात्रेने मोठ्या उत्साहात करण्यात आली.

उत्सवादरम्यान दररोज सकाळी 'परमरहस्य' पारायण, दुपारी महाप्रसाद तसेच सायंकाळी ४ ते ६ या वेळेत विविध महिला भजनी मंडळांच्या भजनसेवा पार पडल्या. यात कल्याणकारी, इच्छापूर्ती, माणिकनगर, बसवेश्वर, जिव्हेश्वर, सेवाभावी शंभू महादेव, वैद्यनाथ, गुरुलिंगस्वामी, सुर्वेश्वर सेवाभावी, शिवकन्या, शनेश्वर आदी महिला भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

जयंतीदिनी दुपारी जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही शोभायात्रेस भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले.यावेळी त्यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष सुरेशआण्णा टाक उपस्थित होते.

उत्सवातील मुख्य आकर्षण ठरली ती परळी शहरातून काढण्यात आलेली भव्य व देखणी शोभायात्रा. विशेष म्हणजे कर्णकर्कश ध्वनी टाळून पारंपरिक पद्धतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी सोलापूर येथील प्रसिद्ध वीरभद्र पुरवंत संघ यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या तलवारबाजी, पारंपरिक नृत्य, वेशभूषा व वाद्य सादरीकरणाने उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. महिला भजनी मंडळांचा सहभागही शोभायात्रेत उठून दिसला. एकसारख्या रंगाच्या साड्या परिधान करून 'पाऊले' खेळणाऱ्या महिलांनी शोभायात्रेला विशेष आकर्षण प्राप्त करून दिले.

ही शोभायात्रा कल्याणकारी हनुमान मंदिर येथून सुरू होऊन माणिकनगर हनुमान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नाथ चित्र मंदिर, हिंगलाज माता चौक (दोस्ती टी हाऊस) मार्गे वडार कॉलनीपर्यंत जाऊन पुन्हा मंदिरात येऊन समारोप करण्यात आला. मार्गावरील नागरिकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व पुष्पवृष्टी करून शोभायात्रेचे स्वागत केले. तसेच पिण्याचे पाणी, चहापान व सरबताची व्यवस्था विविध दानशूर व्यक्तींनी केली होती.शोभायात्रा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी झाली होती. सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्सवाची शोभा वाढवली. कार्यक्रमादरम्यान शहर पोलीस स्टेशन, परळी यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी युवराज गणपत आप्पा काळे, वीरभद्र विश्वनाथ आप्पा काळे,राजाभाऊ शिवाप्पा शेटे, वीरभद्र मारुती जवादे, सुरेश तुकाराम बेल्हाळे, आदर्श शिक्षक अशोक नावंदे सर, रमेश सदाशिव आप्पा काळे, सतीश विठ्ठल भुमकर, सतीश किलचे सर, बाळू शेटे, महेश शिंदे ,वैजनाथ कापसे ,विवेकानंद राघू यांच्यासह वीरशैव लिंगायत समाज बांधव, कल्याणकारी हनुमान मंदिर ट्रस्ट तसेच न्यू माणिकनगर परिसरातील सर्व नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# अभ्यासक्रमाविना परीक्षा: उपवर्गीकरणाच्या नावाखाली लोकशाहीची कसोटी

**ॲड. सुनिल बगाटे व डॉ. राजेंद्र बगाटे**

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दि. १० एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली या शासन निर्णयाद्वारे अहवालावर जनतेकडून आक्षेप, मते आणि निवेदने मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करून आपले अभिप्राय सादर करण्याची मुदत सुरुवातीला १५ एप्रिल २०२६ पर्यंत देण्यात आली होती, जी नंतर आणि दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रेस नोटद्वारे वाढवून ३० एप्रिल २०२६ करण्यात आली. या सर्व प्रक्रियेचा वरकरणी हेतू लोकशाही पद्धतीने जनमत जाणून घेणे असा दिसत असला, तरी प्रत्यक्षात या प्रक्रियेतील अनेक विसंगती आणि विरोधाभास समोर येतात.

सर्वात मूलभूत आणि गंभीर प्रश्न असा आहे की, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविली जात आहेत, तो अहवालच जर सार्वजनिक केला गेला नसेल, तर सामान्य नागरिकांनी नक्की काय वाचून, काय समजून आणि कोणत्या आधारावर आपले मत व्यक्त करायचे? ही परिस्थिती अक्षरशः "अभ्यासक्रमाशिवाय परीक्षा देण्यासारखी" आहे. ज्यांना 'अ ब क ड' काय आहे हेच माहीत नाही, त्यांनी त्या परीक्षेत उत्तरे लिहायची कशी? हा प्रश्न केवळ उपरोधिक नाही, तर तो लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु तो सहभाग अर्थपूर्ण आणि माहितीपूर्ण असला पाहिजे. माहितीच उपलब्ध नसेल, तर सहभाग केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. या संदर्भात पाहिले तर, अहवाल सार्वजनिक न करता मते मागविण्याची प्रक्रिया ही केवळ 'लोकशाहीचा आव आणणारी' ठरते, प्रत्यक्षात ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी आहे.

विशेषतः, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील मोठा वर्ग हा अजूनही सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आणि माहितीच्या अभावामुळे वंचित आहे. अशा परिस्थितीत ई-मेलद्वारे मते मागविण्याची अट ही स्वतःमध्येच भेदभाव करणारी ठरते. ग्रामीण भागातील, डिजिटल साधनसंपत्ती नसलेल्या किंवा संगणक साक्षरता नसलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेत सहभागी होणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणजेच, ज्या घटकांवर या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांनाच या प्रक्रियेपासून दूर ठेवले जात आहे. यातून एक मोठा विरोधाभास समोर येतो की सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबविण्यात येणारी प्रक्रिया प्रत्यक्षात सामाजिक अन्याय वाढविणारी ठरत आहे. उपवर्गीकरणाचा उद्देश जर अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेची अचूक ओळख आणि त्यावर आधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु अहवालाची माहितीच उपलब्ध नसताना, या विषमतेचे स्वरूप काय आहे, त्याची कारणे काय आहेत आणि प्रस्तावित उपाययोजना कोणत्या आहेत, हेच समजत नसल्याने, संपूर्ण प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद वाटू लागते.

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, तज्ज्ञ किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी नसल्याने, या प्रक्रियेतील 'प्रतिनिधित्वाचा अभाव' प्रकर्षाने जाणवतो. जे लोक या निर्णयामुळे थेट प्रभावित होणार आहेत, त्यांचा आवाज या समितीत प्रतिबिंबित होत नाही, ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविण्यासाठी पाच-सहा दिवस आणि सुनावणीसाठी सुरुवातीला केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, ही बाबही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने अपुरी आणि असमाधानकारक आहे. जरी नंतर मुदत वाढविण्यात आली असली, तरी सुरुवातीचा निर्णय हा घाईघाईत आणि अपुऱ्या तयारीत घेतल्याचे स्पष्ट होते. इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा, जनजागृती आणि संवाद आवश्यक असतो, जो येथे दिसून येत नाही.

अहवाल सार्वजनिक न करण्यामागील कारणे काय असू शकतात, हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जर अहवालात मांडलेली माहिती, आकडेवारी आणि शिफारसी या वैज्ञानिक आणि तर्कसंगत असतील, तर त्या सार्वजनिक करण्यास काय हरकत आहे? उलट, पारदर्शकतेमुळे जनतेचा विश्वास वाढतो आणि निर्णय प्रक्रियेची वैधता अधिक दृढ होते. परंतु अहवाल गुप्त ठेवून मते मागविणे ही पद्धत संशय निर्माण करणारी ठरते. या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहिले असता, असे वाटते की, उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ सामाजिक न्यायाचा नसून, तो राजकीय आणि प्रशासकीय अजेंड्याचाही भाग असू शकतो. अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत विभागणी निर्माण करणे, त्यांच्यात स्पर्धा वाढविणे आणि त्यातून राजकीय लाभ मिळविणे, हा एक संभाव्य हेतू असू शकतो, अशी शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत, समाजातील एकात्मता आणि बंधुता धोक्यात येऊ शकते.



**ॲड. सुनिल बगाटे, (विधिज्ञ, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर)**

उपवर्गीकरणाच्या माध्यमातून काही जातींना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला गेला, तर इतर जातींमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर नव्या प्रकारची विषमता निर्माण होत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. याशिवाय, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, प्रतिनिधित्वाचा अभाव, आणि सर्वसमावेशकतेचा अभाव हे तीन मोठे दोष स्पष्टपणे दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे म्हणजे समाजावर प्रयोग करण्यासारखे आहे. आणि समाजावर केलेले असे प्रयोग दीर्घकालीन दृष्टीने हानिकारक ठरू शकतात. म्हणूनच, शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक चर्चा घडवून आणणे, विविध स्तरांवरील प्रतिनिधींना सहभागी करून घेणे आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, हा निर्णय सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विषमता वाढविणारा ठरू शकतो.

या प्रश्नाकडे अधिक सखोलपणे घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि व्यापक सामाजिक परिणाम या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ प्रशासकीय निर्णय नसून ते भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांशी आणि न्यायव्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी जोडलेले असते. भारतीय राज्यघटनेने समानतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. अनुच्छेद १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता देतो, तर अनुच्छेद १५(४) आणि १६(४) या विशेष तरतुदींमधून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना विशेष उपाययोजना म्हणजेच आरक्षण देण्याची मुभा राज्याला दिली आहे. या तरतुदींचा उद्देश केवळ समानतेचा औपचारिक अधिकार देणे नसून, ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या घटकांना प्रत्यक्षात संधींची समानता मिळवून देणे हा आहे. म्हणूनच आरक्षण ही संकल्पना 'समानतेतील असमानता' स्वीकारून 'खऱ्या समानतेकडे' नेणारी उपाययोजना मानली जाते. याच पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरतो. एकीकडे, राज्यघटना राज्याला मागासलेल्या घटकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मुभा देते; परंतु दुसरीकडे, त्या उपाययोजनांमुळे त्या गटामध्येच नव्या प्रकारची विषमता निर्माण होऊ नये, ही देखील एक महत्त्वाची अट आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमध्येच 'अधिक मागास' आणि 'कमी मागास' अशा प्रकारची विभागणी केली जाते, ज्यामुळे मूलभूत एकात्मतेला तडा जाऊ शकतो.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपवर्गीकरणाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, परंतु त्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, उपवर्गीकरण केवळ तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित असले पाहिजे.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**

केवळ राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी असे विभाजन करता येणार नाही. याशिवाय, अशा उपवर्गीकरणामुळे कोणत्याही गटावर अन्याय होणार नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. मात्र, येथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की महाराष्ट्रातील या प्रक्रियेत अशा प्रकारचा वैज्ञानिक आणि पारदर्शक आधार कितपत उपलब्ध आहे? न्यायमूर्ती बदर समितीने सादर केलेला अहवाल सार्वजनिकच करण्यात आलेला नसल्याने, त्यातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अशक्य झाले आहे. न्यायालयाने अपेक्षित केलेली 'वस्तुनिष्ठता' आणि 'पारदर्शकता' या दोन्ही बाबी येथे प्रश्नचिन्हाखाली येतात. घटनात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता, ही प्रक्रिया 'नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वां'शीही विसंगत ठरू शकते. नैसर्गिक न्यायाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, कोणत्याही निर्णयाचा परिणाम ज्यांच्यावर होणार आहे, त्यांना त्या निर्णयाच्या आधारभूत माहितीची पूर्ण जाणीव असली पाहिजे आणि त्यांना आपले मत मांडण्याची संधी दिली पाहिजे. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. माहिती न देता मत मागविणे. त्यामुळे ही प्रक्रिया 'ऐकले जाण्याचा हक्क' (Right to be heard) या तत्त्वालाच बाधा आणणारी ठरते.

याशिवाय, या प्रक्रियेत 'समतोल प्रतिनिधित्वा'चा अभावही स्पष्ट दिसून येतो. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, मानवाधिकार कार्यकर्ते किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश नसल्याने, निर्णय प्रक्रियेत विविध दृष्टिकोनांचा अभाव जाणवतो. लोकशाहीत विविधतेचा सन्मान करणे अत्यावश्यक असते; परंतु येथे एकसुरी प्रशासकीय दृष्टिकोन प्राधान्याने दिसतो. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. अनुसूचित जाती हा गट आधीच सामाजिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित आहे. या गटामध्येच आणखी विभागणी केल्यास अंतर्गत तणाव वाढण्याची शक्यता आहे. काही जातींना अधिक लाभ मिळाल्याची भावना निर्माण झाल्यास, इतर जातींमध्ये असंतोष आणि उपेक्षा वाढू शकते. यामुळे सामाजिक एकात्मतेला धक्का बसू शकतो. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, उपवर्गीकरणामुळे 'वंचितांमध्ये स्पर्धा' वाढण्याचा धोका आहे. जे घटक आधीच मर्यादित संसाधनांसाठी झगडत आहेत, त्यांच्यातच स्पर्धा निर्माण झाल्यास, व्यापक सामाजिक न्यायाचा उद्देशच मागे पडतो. अशा परिस्थितीत, राज्याची भूमिका 'समावेशक विकास' घडवून आणण्याची असताना, ती नकळत 'विभाजन' घडवून आणणारी ठरू शकते.

डिजिटल माध्यमांवर आधारित मते मागविण्याची प्रक्रिया या समस्येला आणखी तीव्र करते. शहरी, सुशिक्षित आणि संसाधनसंपन्न घटकांना या प्रक्रियेत सहभागी होणे सोपे जाते; परंतु ग्रामीण, अशिक्षित आणि उपेक्षित घटक या प्रक्रियेपासून दूर राहतात. यामुळे धोरण तयार करताना एका विशिष्ट वर्गाचे मत अधिक प्रमाणात प्रतिबिंबित होण्याची शक्यता असते. ही बाब 'समावेशक लोकशाही'च्या तत्त्वांशी विसंगत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाहिले असता, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत अनेक पातळ्यांवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. घटनात्मक वैधता, न्यायालयीन निकष, नैसर्गिक न्याय, प्रतिनिधित्व आणि सामाजिक परिणाम. या सर्व बाबींचा सखोल विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते.

म्हणूनच, शासनाने या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, संबंधित अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक आणि माहितीपूर्ण चर्चा घडवून आणणे, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि प्रतिनिधींना सहभागी करून घेणे, आणि त्यानंतरच कोणताही अंतिम निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, उपवर्गीकरणाच्या नावाखाली घेतलेले निर्णय हे सामाजिक न्यायाला बळकटी देण्याऐवजी नव्या प्रकारच्या विषमतेला जन्म देऊ शकतात. या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट आहे की लोकशाही ही केवळ निर्णय घेण्याची प्रक्रिया नाही, तर ती विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आणि हा विश्वास केवळ पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच निर्माण होतो. जर या तत्त्वांकडे दुर्लक्ष झाले, तर "अभ्यासक्रमाविना परीक्षा" ही केवळ उपमा न राहता लोकशाहीच्या अपयशाचे प्रतीक ठरू शकते.

या प्रश्नाचे आर्थिक, राजकीय आणि धोरणात्मक परिणाम अधिक स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ सामाजिक समतोलासाठी नसून, ते आर्थिक संधींच्या पुनर्वाटपाशी आणि राजकीय सत्तासंतुलनाशीही निगडित असते. त्यामुळे या प्रक्रियेचे दूरगामी परिणाम काय असू शकतात, याचा सखोल विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम आर्थिक परिणामांकडे पाहिले, तर अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या संधी शिक्षण, नोकऱ्या, शिष्यवृत्ती, विविध कल्याणकारी योजना या आधीच मर्यादित आहेत. या मर्यादित संसाधनांमध्ये उपवर्गीकरण केल्यास त्याचे विभाजन आणखी सूक्ष्म पातळीवर होईल. परिणामी, काही जातींना अधिक लाभ मिळू शकतो, परंतु इतर जातींच्या संधी कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे 'संधींची समानता' साधण्याऐवजी 'संधींचे पुनर्वाटप' अधिक असमतोल स्वरूपात होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः, ज्या जाती आधीच काही प्रमाणात पुढे आलेल्या आहेत, त्यांना अधिक लाभ मिळाल्यास खऱ्या अर्थाने वंचित घटक पुन्हा मागे पडू शकतात. याशिवाय, उपवर्गीकरणामुळे शैक्षणिक आणि रोजगाराच्या क्षेत्रात स्पर्धेचे स्वरूप बदलू शकते. एकाच गटामध्ये वेगवेगळ्या उपगटांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यास, एकूणच सामाजिक उन्नतीचा वेग कमी होण्याची शक्यता आहे. कारण संसाधनांसाठी होणारी ही अंतर्गत स्पर्धा एकात्मिक प्रगतीऐवजी विखुरलेली प्रगती घडवून आणते. दीर्घकालीन दृष्टीने पाहिले असता, हे आर्थिक सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला बाधा आणणारे ठरू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक संवेदनशील ठरतो. अनुसूचित जाती हा गट राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या गटामध्ये उपविभागणी केल्यास, विविध जातींमध्ये वेगवेगळे राजकीय हितसंबंध निर्माण होऊ शकतात.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Last page

● बीड, मंगळवार, 21 एप्रिल 2026

# लोहा येथे 1 मे रोजी पहिले 'अक्षरलेणं' साहित्य संमेलन


**ग्रंथदिंडी, परिसंवाद आणि कवी** | **ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर भूषवणार** | **विविध राज्यस्तरीय पुरस्कारांचेही वितरण**

**लोहा | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य चळवळीचे मुख्य केंद्र असलेल्या 'मराठी साहित्य मंडळ' आणि 'माय प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने लोहा येथे १ मे रोजी पहिल्या 'अक्षरलेणं' साहित्य संमेलनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. स्व. रुक्मिणबाई नामदेवराव पांचाळ यांच्या प्रथम स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या संमेलनात ग्रंथदिंडी, परिसंवाद आणि राज्यस्तरीय कवी संमेलन अशा कार्यक्रमांची वैचारिक मेजवानी रसिकांना मिळणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर हे या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणार आहेत.

या संमेलनास गोवा येथील उमेश शंकर गाढ, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर, आमदार विक्रम काळे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, अॅड. बी.के. पांचाळ, ललिता गवांदे, सुरेश लोहार (कराड) आणि प्राचार्य रेखा दीक्षित (कोल्हापूर) यांसारखी दिग्गज मंडळी उपस्थित राहणार आहेत.


सस्नेह निमंत्रण...

अखिल भारतीय मराठी साहित्य चळवळीचे मुख्य केंद्र
मराठी साहित्य मंडळ व माय प्रकाशन
यांच्या संयुक्त विद्यमाने
पहिले 'अक्षरलेणं' साहित्य संमेलन
आणि
।। 'माय-बाप' ग्रंथ प्रकाशन सोहळा ।।
शुक्रवार, दि. ०१ मे २०२६


बुक-पोष्ट

प्रति, ______

* संयोजक *
प्रा.डॉ.घ.ना.पांचाळ
राष्ट्रीय सरचिटणीस, मराठी साहित्य मंडळ, मुंबई
पहिले 'अक्षरलेणं' साहित्य संमेलन
भ्र. ९४२१३८१७८५

* स्वागताध्यक्ष *
मा.शरद नामदेवराव पवार
नगराध्यक्ष, नगर परिषद, लोहा
पहिले 'अक्षरलेणं' साहित्य संमेलन
भ्र. ८९९९४६६६१४

• स्थळ •
श्रीनिवास मंगल कार्यालय
छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोहा
ता.लोहा जि.नांदेड


स.न.वि.वि.

मूलतः साहित्यिक, पंडित कवींचा जिल्हा म्हणून नांदेडची ओळख आहे. या भूमीत खूप मोठमोठे साहित्यिक होऊन गेले, आणि अजूनही नव्याने साहित्यिक उदयाला येत आहेत. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने नांदेड जिल्ह्यात खूप खोलवर रुजली आहे. यामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात भर पडावी म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य चळवळीचे मुख्य केंद्र असलेले मराठी साहित्य मंडळ व माय प्रकाशन यांच्या संयुक्त उपक्रमातून पहिले 'अक्षरलेणं' साहित्य संमेलन नांदेड जिल्ह्यातील लोहा शहरात, माझ्या मायीच्या स्मृतीदिनानिमित्त दि.१ मे २०२६ रोजी आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. सदरील संमेलन हे लोहा शहरातील श्रीनिवास मंगल कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोहा ता.लोहा जिल्हा नांदेड येथे संपन्न होणार आहे. तमाम महाराष्ट्रातील व लोहा शहरातील लेखक,कवी व रसिकांना प्रथमच ही वैचारिक मेजवानी मिळणार आहे. तरी आपण या संमेलनास आवर्जून उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

संयोजक
प्रा.डॉ.घ.ना.पांचाळ
(राष्ट्रीय सरचिटणीस)
मराठी साहित्य मंडळ, मुंबई

• कार्यक्रमाची रूपरेषा •
शुक्रवार, दि. ०१ मे २०२६
ग्रंथदिंडी : सकाळी ०८.०० वा.
ग्रंथदिंडी उद्घाटन : मा.ह.भ.प.श्री.हनुमंतराव भालेराव गुरुजी लोहेकर
मा.ह.भ.प.श्री.आत्माराम महाराज रायवाडीकर

उद्घाटन व पुरस्कार वितरण सोहळा
सकाळी १०.०० ते ०१.०० वा.

• संमेलनाध्यक्ष •
मा.प्रा.डॉ.प्रल्हाद जी लुलेकर
ख्यातनाम साहित्यिक व जेष्ठ विचारवंत, छ.संभाजीनगर

• उद्घाटक •
मा.आ.प्रतापराव पाटील चिखलीकर
विधानसभा सदस्य, कंधार-लोहा मतदार संघ

प्रमुख अतिथी
मा.श्री.उमेश शंकर गाड
पेडणे, गोवा राज्य, मावळते संमेलनाध्यक्ष
मा.डॉ.जयप्रकाश घुमटकर
जेष्ठ साहित्यिक तथा राष्ट्रीय अध्यक्ष, मराठी साहित्य मंडळ
मा.आ.विक्रम वसंतराव काळे
आमदार, छ.संभाजीनगर, विभाग शिक्षक मतदार संघ
मा.प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार
जेष्ठ विचारवंत, लातुर
मा.अॅड.बी.के. पांचाळ
अध्यक्ष, कंधार अभिवक्ता संघ, कंधार
मा.ललिता गवांदे
जेष्ठ कवयित्री तथा उपाध्यक्षा मराठी साहित्य मंडळ

विशेष अतिथी
मा.श्री.सुरेश लोहार
माजी संमेलनाध्यक्ष, कराड
मा.प्राचार्य रेखा दीक्षित
जेष्ठ कवियीत्री तथा माजी संमेलनाध्यक्ष, कोल्हापूर

* सुत्र संचलन : श्री.संदीप रासकर
* आभार प्रदर्शन : डॉ.संगीता घुगे

## विशेष आकर्षण: परिसंवाद आणि कवी संमेलन

**परिसंवाद (दुपारी २ वा.):** 'आई-वडील आपल्या अस्तित्वाची खरी ओळख' या विषयावर डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होईल. यात अश्विनी दीक्षित (बारामती) व विनायकराव जाधव (कराड) सहभागी होतील.

**कवी संमेलन:** ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात ठाणे, सुरत, जळगाव, पुणे, सोलापूर अशा विविध भागांतील नामवंत कवी आपली कला सादर करतील.



## संयोजकांचे आवाहन-

"स्व. रुक्मिणबाई पांचाळ यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित या पहिल्या संमेलनास साहित्यप्रेमी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे," असे आवाहन संयोजक तथा मराठी साहित्य मंडळाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. घ.ना. पांचाळ यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार सोहळ्यात लातूरचे पत्रकार संतोष सोनवणे सन्मानित



**मुंबई | प्रतिनिधी**

समृद्धी पर्यटन सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय "विकासरत्न प्रेरणा पुरस्कार" व समृद्धी कला सादरीकरण सोहळा २०२६ हा भव्य कार्यक्रम रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी कांदिवली (पूर्व), मुंबई येथील अशोक सावंत हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत आकर्षक आणि संस्मरणीय ठरला.

या सोहळ्यात लातूर येथील दैनिक जगमित्रचे जिल्हा प्रतिनिधी, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष सोनवणे यांना त्यांच्या पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व प्रभावी कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठित "विकासरत्न प्रेरणा पुरस्कार" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सन २०१७ पासून पत्रकारितेत सक्रिय असलेल्या सोनवणे यांनी समाजातील विविध ज्वलंत प्रश्नांवर निर्भीडपणे आवाज उठवत जनजागृती केली असून, त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येण्यास मोलाचा हातभार लागला आहे.

■ **मान्यवरांची उपस्थिती:**

या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, गीतकार व समाजकार्यकर्ते अॅड. बाळासाहेब तोरस्कर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रकाशदादा सुर्वे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस सब इन्स्पेक्टर मंगेश अनंत नाईक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले.

स्वागताध्यक्ष व संयोजिका म्हणून सौ. मीनाक्षी महादेव पाखरे यांनी उपस्थित मान्यवरांचे मनपूर्वक स्वागत केले, तर ट्रस्टचे सचिव महेश महादेव पाखरे यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व यशस्वी आयोजन केले.

यावेळी राष्ट्रीय सुवर्णपदक प्राप्त प्राध्यापिका व ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अलका नाईक तसेच डॉ. रावसाहेब नाना घोडेराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे आमदार प्रकाशदादा सुर्वे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. आपल्या भाषणात त्यांनी पत्रकारिता व समाजकार्य हे लोकशाहीचे भक्कम आधारस्तंभ असल्याचे सांगत, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

सोहळ्यात कला, क्रीडा, साहित्य व चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली व कार्यक्रमाची शोभा अधिक खुलवली.

कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर, कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

## उत्कृष्ट नियोजन व भोजन व्यवस्थेची विशेष दखल

**कार्यक्रमासोबतच आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व पाहुण्यांसाठी अत्यंत सुंदर, सुटसुटीत व नियोजनबद्ध पद्धतीने भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छता, शिस्तबद्धता आणि रुचकर खाद्यपदार्थ यामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे मनापासून कौतुक केले. या व्यवस्थेमुळे कार्यक्रमाला अधिक चारचाँद लागले.**

# ठोस आश्वासनाने रस्ते नुतनीकरण प्रश्न मिटला

## कार्यकारी अभियंता यांच्या आश्वासनाने आंदोलन तूर्तास स्थगित

**परळी / प्रतिनिधी**

अंबाजोगाई - मोहा - सिरसाळा व परळी - नागापूर - बोधेगाव - मोहा - सर्फराजपूर या दोन रस्त्यांचे तात्काळ अद्यवतीकरण करा या मागणीसाठी भारताच्या लोकशाहीवादी युवक संघटना (डीवायएफआय) ने रखरखत्या उन्हात म्हतारगाव फाटा कान्नापूर या ठिकाणी मागील पाच दिवसापासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. या आंदोलनास पाठींबा म्हणून या खराब मार्गाने बाधित गावकऱ्यांनी टायर जाळून बांधकाम विभागाचा निषेध केला. आंदोलनाची तीव्रता पाहता विभागाचे कार्यकारी अभियंता स्वामी, उपअभियंता मुंडे यांनी सोमवार दि 20 रोजी आंदोलनकर्त्यांनी भेट घेतली. सुमारे दीड तास आश्वासक चर्चेअंती हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले.

परळी तालुक्यातील मोहा गावाला अंबाजोगाई आणि परळी या दोन्ही तालुक्याला जोडणा-या राज्य महामार्गाची अतिवृष्टीमुळे चाळणी होऊन या मार्गावरील पूल देखील खचले गेले आहेत. आरोग्य, शिक्षण, व्यापार आदी विविध कारणाने या मार्गावरुन हजारो नागरिकांची वर्दळ असताना जीव मुठीत घेऊन या मार्गावर प्रवास करावा लागत आहे.

कार्य आदेश पारित होऊन देखील काम झाले नसल्याने या मार्गावरील युवकांनी बेमुदत



ठिय्या आंदोलन करण्याचा पावित्रा घेतला.राज्य मार्ग 211 व राज्य मार्ग 486 या दोन्ही मार्गाला जोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक म्हतारगाव फाटा कांनापूर ता-धारूर या ठिकाणी रखरखत्या उन्हात गुरुवार दि 16 पासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. या आंदोलनाची दखल घेत उपअभियंता मुंडे, परळीचे तहसीलदार विनोद रणवरे यांनी भेटी दिल्या मात्र ठोस आश्वासन दिले नसल्याने आंदोलन सुरूच राहिले. या आंदोलनासाठी या राज्य मार्गामुळे वाघाळा, नागापूर, मांडेखेल, बोधेगाव, म्हतारगाव, कांनापूर, मोहा, वंजारवाडी, सरफराजपूर, गर्देवाडी आदी बाधित गावकऱ्यांनी रस्त्यावर एकत्र येत टायर जाळून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. दरम्यान आंदोलनाची व्याप्ती पाहता विभागाचे कार्यकारी अभियंता स्वामी, उपअभियंता मुंडे यांनी भेट देऊन सिरसाळा-मोहा रस्त्याची 8 दिवसात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल व परळी-नागापूर मार्ग नुतनीकरण निविदा पुनरप्रकाशीत करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्याने हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले. या भेटी दरम्यान ऑड.अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे, सुदाम शिंदे, भागवत देशमुख, विशाल देशमुख, प्रवीण देशमुख, विष्णुपंत देशमुख, विजय घुगे, सिद्राम सोळंके, प्रशांत मस्के, इस्माईल शेख, सुशील देशमुख, करेवाडीचे सरपंच लक्ष्मण कावळे, कांनापूरचे सरपंच गोपाळ कुकडे, कावळेवाडीचे सरपंच जगन्नाथ कावळे यांच्यासह परिसरातील गावातील शेकडो युवक, नागरिक उपस्थित होते.

# परळी तालुक्यात शिवसेनेची नवी नियुक्ती; तालुका समन्वयक पदाची ज्ञानोबा फड यांच्यावर जबाबदारी

## फुलचंद कराड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार

**परळी, वैजनाथ | प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी परळी तालुक्यात महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. धर्मापुरी येथील ज्ञानोबा उर्फ (माऊली) नरहरी फड यांची शिवसेना पक्षाच्या परळी तालुका समन्वयक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. दरम्यान फड यांची परळी तालुका समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार शिवसेनेचे शिंदे गट महाराष्ट्र समन्वयक तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार करण्यात आला.

ही नियुक्ती शिवसेनेचे बीड जिल्हा जिल्हाप्रमुख सचिन अर्जुनराव मुळूक यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या नियुक्तीपत्राद्वारे जाहीर केली. या नियुक्तीला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाची, तसेच धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेची जोड असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार ही निवड करण्यात आल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सदर पदाचा कार्यकाळ एक वर्षाचा असून, या कालावधीत ज्ञानोबा उर्फ माऊली फड यांनी शिवसेनेच्या हिंदुत्वाच्या विचारांचा प्रचार-प्रसार करावा आणि संघटन अधिक मजबूत करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे परळी तालुक्यातील शिवसेना संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असल्याची प्रतिक्रिया पक्षाच्या कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.



## फुलचंद कराड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार

**ज्ञानोबा नरहरी फड यांची शिवसेनेच्या परळी तालुका समन्वित पदी निवड नुकतीच करण्यात आली आहे. या निवड होताच परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडून शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे महाराष्ट्र समन्वयक तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने, अंबाजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन भाऊ वाघमारे, भागवत नागरगोजे, भक्तरामजी कांदे, अरुण दराडे, सोनहिरा उपसरपंच गोविंद सुदाम मुंडे, रवी कराड, धरणीधर महाराज आघाव, संभाजी सोळंके, लहूदास रोडे, वैजनाथ कराड, भागवत नागरगोजे, संभाजी केंद्रे, गोटू कातखडे, निलेश कातखडे, विशाल डिघोळे, रघुनाथ चप्पे, महेश गवळी आदींची उपस्थिती होती.**